http://maharashtratimes.indiatimes.com/cms.dll/articleshow?msid=६४८१६

# बेस्ट बेकरी खटला साक्षीपुराव्यांसह नव्याने मुंबईत चालवावा

*म. टा. प्रतिनिधी*

मुंबई : बडोद्यातील बेस्ट बेकरी हत्याकांडाच्या खटल्यामध्ये मला जबानी बदलण्यासाठी जीवे मारण्याची देण्यात आली होती. आता याप्रकरणी गुजरातेत आम्हाला न्याय मिळेल, असे वाटत नाही. त्यामुळे हा संपूर्ण खटला साक्षीपुराव्यांसह नव्याने मुंबईतील न्यायालयात चालवावा, अशी कळकळीची मागणी या घटनेत होरपळलेल्या कुटुंबातील साक्षीदार व खटल्यातील मुख्य तक्रारदार झाहिरा शेख हिने सोमवारी येथे केली.

बडोदा येथे १ मार्च २००२ रोजी घडलेल्या बेस्ट बेकरी हत्याकांडामध्ये १४ जणांची निर्घृण हत्या करण्यात आली होती. या हत्याकांडात आपल्या कुटुंबियांच्या हत्येची साक्षीदार असलेली झाहिरा हबीबुल्ला शेखने 'सिटिझन्स फॉर जस्टिस अॅन्ड पीस' या स्वयंसेवी संघटनेकडे आपल्यावरील अन्याय दूर करण्यासाठी संपर्क साधला. त्यानंतर आता ती मुंबईत आली असून या संघटनेतफेर् हा खटला बडोद्याबाहेर पुन्हा चालविण्यासाठी कायदेशीर बाजूची पडताळणी करण्यात येत आहे. गरज पडल्यास सवोर्च्च न्यायालयात दाद मागू, असे संघटनेतफेर् वार्ताहर बैठकीत सांगण्यात आले. या बैठकीत झाहिरा शेख हिने तिस्ता सेटलवाड, अॅलेक पदमसी, जावेद अख्तर यांच्या उपस्थितीत तिच्यावरील अन्यायाला वाचा फोडली. बडोद्यातील अतिरिक्त सत्र न्यायाधीशांपुढे खटला सुरू झाल्यावर आम्हाला सरकारकडून कोणतीही मदत मिळाली नाही, उलट स्थानिक नेते मधुकर श्रीवास्तव, चंदकांत श्रीवास्तव यांच्याकडून सतत जीवे मारण्याच्या धमक्या येत राहिल्या, असा आरोप तिने केला.

या धमकीसत्रामुळे न्यायालयात आरोपींना आम्ही ओळखत नसल्याचे सांगणे भाग पडले. त्याच दिवशी तासभर माझे साक्षीपुरावे घेण्यात आले, परंतु मला एकही प्रश्ान् विचारण्यात आला नाही. सुनावणीपर्यंत सरकारी वकिलांनी एकदाही माझ्याशी सल्लामसलत केली नाही. माझ्या बाजूने खटला लढविण्यासाठी वकिलांनीही चार लाख रुपयांची मागणी केली होती. खटल्याच्या वेळी सर्व हिंदू लोक तेथे उभे होते आणि माझ्याकडे सगळे डोळे फाडफाडून बघत होते. या सगळ्या परिस्थितीत माझी जबानी फिरविण्याशिवाय माझ्याकडे पर्याय नव्हता, असे ती म्हणाली.